जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 APR 2018
सकाळ

# डॉ. डी. एन. काशीद यांचा सत्कार

कोल्हापूर, ता. ८ : येथील रवळनाथ को ऑपरेटिव्ह हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे शिवाजी विद्यापीठातील संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. एन. काशीद यांचा सत्कार शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के यांच्या हस्ते झाला. प्रा. डॉ. काशीद यांची विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यपदी तसेच संख्याशास्त्र विषय अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. याबद्दल डॉ. शिर्के यांच्या हस्ते डॉ. काशीद यांचा सत्कार झाला. एम. एल. चौगुले यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. वर्षा मैंदगी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. आण्णासाहेब कलगोंडा यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 APR 2018
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील 'एचआर' बैठकीचा शुभारंभ करताना गणेश आणेकर, डॉ. जे. एस. बागी, राजू जांभेकर, विजय पाटील आदी.

# संवाद कौशल्यावर विद्यार्थ्यांनी भर द्यावा

## शिवाजी विद्यापीठात आयोजित 'एचआर' बैठकीत सूर

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

जागतिकीकरणात प्रचंड स्पर्धा आहे. स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासाबरोबर संवाद कौशल्यावर भर दिला पाहिजे, असा सूर शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील आयोजित एचआर बैठकीत उमटला. या बैठकीचे उद्घाटन विविध मान्यवरांच्या हस्ते रोपट्याला पाणी घालून करण्यात आले. ३५ कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तंत्रज्ञान अधिविभागप्रमुख डॉ. जे. एस. बागी अध्यक्षस्थानी होते.

मायक्रोसॉफ्ट कंपनीचे गणेश आणेकर म्हणाले, मुलाखतीला सामोरे जाताना आत्मविश्वास सगळ्यात महत्वाचा असतो. कोणत्याही कंपनीत काम करताना भरपूर कष्ट करण्याची तयारी असली पाहिजे. इंग्रजी बोलता येण्याबरोबर त्याचा मराठीत अर्थही सांगता आला पाहिजे. काम करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, त्यामुळे समजून घेऊन त्यावर मार्ग काढण्याची तयारी असली पाहिजे, असेही आणेकर यांनी सांगितले.

सर्वच कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विभागातील विद्यार्थ्यांशी खुली चर्चा करून त्यांच्या अडचणी समजून घेतल्या. या अडचणींना कशा प्रकारे सामोरे गेले पाहिजे याविषयावर मार्गदर्शनही केले. सर्व कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या किंवा चौथ्या शनिवारी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असून विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण घेणार आहेत. यावेळी मायक्रोसॉफ्ट, घाटगे-पाटील इंडस्ट्री, देसाई ब्रदर्स, विनती ऑरगॅनिकचे राजू जांभेकर, सेल कंपनीचे विजय पाटील, शाम एस. दामोदरम, डॉ. एस. बी. चव्हाण, डॉ. एस. बी. सादले, डॉ. पी. डी. पाटील, डॉ. ए. के. साहू, डॉ. एम. एस. साळुंखे, डॉ. आर. व्ही. माने-देशमुख, डॉ. पी. ए. प्रभू आदी उपस्थित होते.

9 APR 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुलगुरू व प्रशासनाची विद्यापीठ हिताप्रती बांधिलकी सर्वोच्च

## शिवाजी विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांच्या बैठकीत सूर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ प्रशासन आणि कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची कार्यप्रणाली आणि विद्यापीठ व विद्यार्थी हिताप्रती बांधिलकी सर्वोच्च आहे. त्यामुळे त्यांच्या पाठीशी आम्ही खंबीरपणे उभे आहोत, अशी ग्वाही शिवाजी विद्यापीठाशी संबंधित विविध संघटनांनी येथे झालेल्या बैठकीत दिली असल्याची माहिती प्रशासनाने प्रसिद्धीस दिली आहे.

शिवाजी युनिव्हिर्सटी पोस्ट ग्रॅज्युएट टिचर्स असोसिएशन (सुप्टा), शिवाजी युनिव्हिर्सटी ऑफिसर्स वेल्फेअर फोरम, शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघ, शिवाजी विद्यापीठ मागासवर्गीय कर्मचारी संघटना या संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची विद्यापीठात बैठक झाली.

या बैठकीला कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे उपस्थित होते.

यावेळी विविध मान्यवरांनी स्पष्ट केले की, कुलगुरू डॉ. शिंदे यांच्याकडे राज्यपालांनी मुंबई विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदाची जबाबदारी सोपविली. ही जबाबदारी मोठ्या कौशल्याने आणि आत्मीयतेने ते पार पाडत आहेत. या परिस्थितीतही शिवाजी विद्यापीठाकडेही त्यांचे बारकाईने लक्ष आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. शिंदे आणि विद्यापीठ प्रशासन यांच्यासोबत विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्व संघटना कटिबद्ध आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 APR 2018 Times of India

# SUK invites applications for law exam

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has invited exam applications with regular fee from three-year and five-year course students of law by April 13.

The applications will be allowed to be submitted from April 14 to 18 with late fee and from April 19 to 21 with super late fee. The exam will start from May 25.

The March 31 circular from Mahesh Kakade, director of board of examinations and evaluation, SUK, stated that the first semester exam of three-year and five-year law courses were conducted in February due to various issues. Their results were declared on March 10.

Colleges have been asked to submit the student list to the university by April 18 with regular fee and by April 24 with super late fee.

A university official said that exam preparations have already started, as the semester examination of other courses is already ongoing.

According to SUK's statistical information of 2016-17, the Kolhapur division has seven law colleges affiliated to SUK, where over 2,500 students are studying. Out of seven colleges, four are permanently affiliated with the university, while three have temporary affiliation.

CAMPUS BUZZ



**Shivaji University, Kolhapur (SUK) has invited submission of magazines from affiliated colleges, by April 30, for its annual magazine competition. It may be noted that SUK organises a magazine competition amongst its academic circle every year, since 1970**

**Submissions for magazine competition invited:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has invited submission of magazines from affiliated colleges, by April 30, for its annual magazine competition. It may be noted that SUK organises a magazine competition amongst its academic circle every year, since 1970.

The competition is meant to develop and provide students a platform to express their creative writing.

"This is one of the oldest traditions in the university's history and students need to make most out of it," said a university official.

The official added that there were 73 conventional course colleges and 15 professional colleges which participated in the competition last year.

**Four ZP schools get sanitary napkin vending machines:** Four zilla parishad schools have installed sanitary napkin vending and disposable machines from the funds provided by MLA Satej Patil. According to ZP officials, the machines were handed over by the MLA's wife Pratima Patil to respective school authorities last week.

**Essay, poster presentation competition at SUK:** On the occasion of 127th birth anniversary of Dr Babasaheb Ambedkar, SUK has organised an essay and poster presentation competition. According to officials, students should register themselves with the university's Dr Babasaheb Ambedkar Research and Development Centre by April 12.

The centre has provided a list of five topics for the essay competition, which have to be written within the prescribed word limit of 3,000 words. The essays have to be submitted by April 12 to the centre. For more details contact 0231-2609396.